महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती–444 602
Email: divsecamt@rediffmail.com
Tel. 0721-2662647, 0721-2662608
Website: sscboardamravati.in

पत्र क्र.अविमं/उमाप/यो.प्र./ १६६५
दिनांक:-१८/०४/२०२४

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग,अमरावती.

विषयः-इ.११ वी /इ.१२ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी महाराष्ट्राबाहेरील /परदेशातुन आलेल्या (अन्य मंडळातून इ.१०वी /इ.११ वी उत्तीर्ण केलेल्या) विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्रासंबंधी करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भः-राज्यमंडळ,पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/रामकक्षता/४२०९,दि.०५/१०/२०२०

सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी राज्याबाहेरुन/ परदेशातून किंवा अन्य मंडळाच्या इ.१० वी / इ.११ वी परीक्षा उत्तीर्ण होऊन या मंडळाच्या कक्षेतील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ.११ वी / इ.१२ वी करीता तात्पुरता प्रवेश घेतात त्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अधिनियम १९६५नुसार व मंडळ विनियम १९७७ नियम क्र.८०(१) अन्वये आवेदनपत्रे /प्रस्ताव मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

इ.११ वी /इ.१२ वी मध्ये राज्यातील, राज्याबाहेरील व परदेशातील इ.१० वी /इ.११ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांचेकडून योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खालील दस्तऐवज आवश्यक आहेत.

१) योग्यता प्रमाणपत्राचा विहित नमुन्यातील मूळ अर्ज (अर्जाची छायांकित प्रत सादर करु नये.)
२) उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित छायांकित प्रत स्वसाक्षांकित (Self Attested) केलेली असावी.
३) मुळ प्रमाणपत्र संबंधित मंडळाकडून प्राप्त झालेले नसल्यास मुळ तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व त्याची प्रमाणित छायांकित प्रत.
४) मुळ स्थलांतर प्रमाणपत्र (Original Migration Certificate) आवश्यक राहील,डिजीटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सादर करु नये.सादर केल्यास अर्ज अमान्य करण्यात येईल.
५) अर्जासोबत जोडलेली विहित नमुन्यातील हमीपत्र(Deed Of undertaking) हे विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे नमुद कागदपत्रांचा स्वतंत्र संच करुन प्रस्तावासह जोडण्यात यावा,तसेच त्यासह प्राचार्यांचे पत्र (आवेदनपत्रासोबत जोडलेले) हमीपत्र मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्या आधी विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या विषयाचा अभ्यासक्रम इत्यादी आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी करुनच त्यांना तात्पुरता प्रवेश द्यावा. योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वतः प्राचार्यानी सही करुन प्रमाणित करावेत.

इ.११ वी /इ.१२ वी मध्ये विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश देतेवेळी मंडळाचे निकषानुसार विद्यार्थी इ.१० वी /इ.११ वी मध्ये इंग्रजी विषयासह ०५ विषय घेवून उत्तीर्ण झालेला असावा. इ.१० वी /११ वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकातील गुण ग्रेडमध्ये असल्यास त्या ग्रेडचे विषयनिहाय गुण

टक्केवारीत करणे आवश्यक आहे. राज्यमंडळाने मान्य केलेल्या समकक्षता यादीनुसार राज्यातील, राज्याबाहेरील/परदेशातील कोणत्याही मंडळाची (समकक्षता यादी मंडळाच्या **www.mahahsscboard. Maharastra.gov.in**) या वेबसाईटवर पाहूनच खात्री करून प्रस्ताव पाठवण्यात यावा.

कनिष्ठ महाविद्यालयाने योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज मंडळाकडे पाठविण्याचा अंतिम दिनांक व अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्यासंबंधी मुदत खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

१) नियमित शुल्कासह **दि.१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत प्रस्ताव कार्यालयात सादर करावे.** कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज मंडळाकडे पाठविण्याची अंतिम तारीख १५ सप्टेंबर राहील. अन्य मंडळातील विद्यार्थी शुल्क रू. ५००/- व परदेशातुन आलेल्या विद्यार्थ्यांसाठी रू.७००/- याप्रमाणे शुल्क स्विकारून चलानद्वारे मंडळाकडे पाठविण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांनी इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला आहे,त्यांनी समकक्षतेसाठी अर्ज सादर करणे, तसेच कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यास थेट इ.१२ वी मध्ये प्रवेश दिल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

२) **१६ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये प्राप्त झालेले अर्ज मंडळाकडे पाठवितांना प्रत्येक विद्यार्थ्याकडून नियमित शुल्कासह रु.५०० +विलंब शुल्क रू .१००/-(५००/-+ १००/-) आकारण्यात येईल.तसेच दि.१६ नोव्हेंबर पासून मंडळ कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचे तारखेपर्यंत प्रतिदिन रु.२०/-शुल्क आकारण्यात येईल**.संदर्भिय पत्रान्वये इ.११वी/इ.१२वी मध्ये योग्यता प्रमाणपत्रासाठी मुदतीत अर्ज न पाठविल्यास व मंडळाच्या सूचनांव्यतिरिक्त नियमबाह्य कृती केल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास **१ जून पासून रु.१०००/- (प्रतिविद्यार्थी) प्रमाणे दंड आकारण्यात येईल.**

३) **१६ नोव्हेंबर पासून ३१ मे पर्यंत** प्राप्त होणारे अर्ज कारणासह व आपल्या शिफारशीसह विभागीय मंडळाकडे पाठवावेत.मात्र अशी प्रकरणे मा.विभागीय अध्यक्ष यांच्या अनुमतीने विद्यार्थ्याने नमूद केलेले कारण योग्य आहे किंवा नाही याची खात्री करुन स्विकारण्यात येतील.अशा **विद्यार्थ्याकडुन नियमित शुल्क + विलंब शुल्क व प्रतिदिनी रु.२०/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.**

४) **योग्यता प्रमाणपत्र प्रस्तावातील कागदपत्राच्या त्रुटीबाबत :-**

अ. **इ.११ वी साठीच्या** योग्यता प्रमाणपत्र प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता **२० जानेवारी पर्यंत** करावी,अन्यथा सदरहू विद्यार्थ्याकडून दिनांक, **२१ जानेवारी** पासून प्रतिदिनी रु.२०/- प्रमाणे व प्रतिविद्यार्थी रु.१००/- प्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकडून दंड आकारण्यात येईल.

ब. **इ.१२ वी साठीच्या** योग्यता प्रमाणपत्र प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता **०५ जानेवारी पर्यंत** करावी, अन्यथा सदरहू विद्यार्थ्याकडून दिनांक, **०६ जानेवारी** पासून प्रतिदिनी रु.२०/- प्रमाणे व प्रतिविद्यार्थी रु.१००/-प्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकडून दंड आकारण्यात येईल इ.११ वी मध्ये प्रवेश घेवून इ.१२वी मध्ये गेलेले विद्यार्थ्यासाठी त्रुटी पूर्तता करण्यासाठी **३० ऑगस्ट** ही शेवटची तारीख असून ३० ऑगस्ट पर्यंत त्रुटीपूर्तता न झाल्यास विद्यार्थ्याचा प्रस्ताव अमान्य करुन सदर विद्यार्थ्याचे आवेदनपत्र व परीक्षेची संपादणूक रद्द करण्यात येईल.याबाबत मंडळाने केलेली कार्यवाही बंधनकारक राहील.

५) ज्या विद्यार्थ्यांनी अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केली नाही, अशा विद्यार्थ्यांचा इ.११ वी परीक्षेचा निकाल कनिष्ठ महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत जाहीर करु नये व इ.१२ वी च्या वर्गात (पुढील वर्षी) प्रवेश देवू नये,तसे झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) ज्या विद्यार्थ्यांची समकक्षता मंडळाने अद्याप निश्चित केलेली नाही, अथवा ज्या परीक्षांची नावे समकक्षता यादीत समाविष्ट नाही अशा विद्यार्थ्याना इ.११/इ.१२ वीत प्रवेश देतांना त्यांच्या संपूर्ण कागदपत्रांची काटेकोर पडताळणी करुन विद्यार्थी इ.११/इ.१२ वीत कोणत्या शाखेत प्रवेश घेण्यास

पात्र आहे ते पडताळूनच त्याला त्या शाखेत तात्पुरता प्रवेश दिल्यानंतर ताबडतोब सदर प्रकरण संपूर्ण कागदपत्रासह विभागीय मंडळाकडे पाठविण्यात यावे. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांबाबत संबंधित विद्यार्थ्यांना इ.१२ वीच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्यास अडचण निर्माण झाली, तर त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील,त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.

७) सी.बी.एस.ई व आय.सी.एस.ई वगळुन राज्याबाहेरील/ अन्य मंडळातुन इ.१० वी/इ.११ वी च्या शाळा सोडण्याच्या दाखल्यावर (**School Leaving/Transfer Certificate**)संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी किंवा सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी (**Countersign**) असल्याशिवाय मंडळाकडे प्रस्ताव सादर करु नये.

८)राष्ट्रीय मुक्त विद्यापिठातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी कोणत्याही वर्गाची शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी अथवा संपर्क केंद्राने दिलेला दाखला जोडलेला असावा.

९) परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता**Appendix-A** भरणे आवश्यक आहे.(अर्जात नमुद केल्याप्रमाणे)

टिप–परदेशातुन येणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्व कागदपत्रे भारतीय दूतावास(**Indian Ambassy**)/विदेशी दुतावासाकडून(**ForeignAmbassy**) प्रमाणित करणे आवश्यक आहे,याची कनिष्ठ महाविद्यालयाने काटेकोरपणे तपासणी करणे आवश्यक आहे.

१०)परदेशातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशापूर्वी समकक्षता यादीत उल्लेख नसलेल्या संस्थेच्या/मंडळाच्या विद्यार्थ्यांस प्रवेश देवू नये.त्याच्या प्रवेशाबाबत मंडळाच्या मान्यतेसाठी मंडळाशी संपर्क साधावा. संबंधिताचे सर्व मुळ कागदपत्रे भारतीय दुतावासाच्या सहीशिक्क्यासहित व अभ्यासक्रम पुस्तिकांचे २ प्रमाणित छायांकित प्रतीसह प्रकरण मंडळाकडे द्यावे लागेल,याची कृपया नोंद घ्यावी.

११)सन २०२०-२१ पासून कोणत्याही मुद्रांक शुल्कावर (स्टँम्प पेपर) प्रतिज्ञापत्र घेऊ नये, यापुढे सदरचे प्रतिज्ञापत्र हे विद्यार्थी/पालक यांचेकडून को-या किंवा छापिल नमुन्यावर घेण्यात यावे व त्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

१२)शैक्षणिक खंड(गॅप)असेल तर अशा विद्यार्थ्याच्या प्रवेशास शैक्षणिक खंडाबाबत प्रतिज्ञापत्र (ॲफेडेव्हिट)देणे आवश्यक आहे.

**विशेष सुचना:**

अ) इ.११ वी करीता ज्या विद्यार्थ्यांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज वेळेत सादर केला आहे, परंतु अर्जासोबत आवश्यक कागदपत्र अपूर्ण आहेत,त्याची **२० जानेवारी** पर्यंत पूर्तता करावी. मात्र त्यासाठी २१ जानेवारी पासून प्रतिदिनी रु.२०/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.तसेच संबंधित संस्थेकडून/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रति विद्यार्थी रु. १००/- दंड वसूल करण्यात येईल व दिनांक ३० ऑगस्ट पर्यंत उर्वरीत प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश व संपादणूक/निकाल रद्द करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ब)योग्यता प्रमाणपत्राकरीता सादर करावयाचा अर्ज भारतीय विद्यार्थ्यांसाठी रु.२००/- व परदेशातुन आलेल्या विद्यार्थ्यांसाठी रु. ७००/- रक्कम जमा करुन मंडळ कार्यालयातुन प्राप्त करुन घेता येईल.तेव्हा, वरीलप्रमाणे सर्व संबंधित महाविद्यालयांनी योग्य ती कार्यवाही निर्धारीत वेळेमध्ये करावी.

क)(१)माध्यमिक शिक्षा परीषद,मध्यभारत,ग्वालिअर (म.प्र.),(२)महाराष्ट्र माध्यमिक शिक्षा परीषद, मलकापूर (महाराष्ट्र),(३) कॉन्सिल ऑफ सेकंडरी एज्युकेशन,मोहाली व (४) आय.टी.एम.एस., मलकापुर या संस्थांचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांचेशी समकक्ष नाही तसेच आय.टी.एम.एस.मलकापुर या संस्थेस अमरावती विभागीय शिक्षण मंडळाची मान्यता नसल्याने इ.१०वी/इ.११ वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये.

ड)अन्य मंडळातून आलेल्या विद्यार्थ्यांना इ १२ वीचे परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे कनिष्ठ महाविद्यालयास बंधनकारक आहे, अन्यथा परीक्षेचे आवेदनपत्रे भरता येणार नाही. परंतू योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर न करता परस्पर विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे भरुन विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केले जातात, सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आली असल्याने यापुढे अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याबाबत

कार्यवाही करण्यात येईल व विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करण्यात येईल,याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

इ) योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज प्राप्त होताच मंडळात सादर करावे अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.

फ)उपरोक्त सूचनांची माहीती योग्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणा-या सर्व संबधित विद्यार्थ्यांना द्यावी.

(निलिमा टाके)
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**प्रतिलिपी**:-१)मा.सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-०४
२)शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती.
३)शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ व वाशीम.